# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक,४२२ २२२

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

## बी.एड.विशेष शिक्षण (P21)

## B.Ed.Spl.Ed. (HI, VI, MR)

## अभ्यासकेंद्र मार्गदर्शिका

**सौ. शर्मिष्ठा ओक** **डॉ. सुरेश पाटील**

**मुक्त विद्यापीठविषयी माहिती**

महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना १ जुलै १९८९ रोजी केलेली आहे. औपचारिक शिक्षण अर्धवट राहिलेल्यांना अर्थार्जन करीत पुढे शिक्षण घेता यावे. ह्या हेतूने मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. अशा शिक्षणाचे अनेक लाभ आहेत. निर्भळ ज्ञानसाधना करता येते. स्वतःची नोकरी, व्यवसाय वा उद्योग नव्या ज्ञान-कौशल्यांतून अधिक नेटका करता येतो. हा अनुभव जगभरच्या मुक्त विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्यक्रमातून शिक्षण घेणाऱ्यांना येत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. सेवा-उद्योग करणाऱ्या युवक-युवतींच्या पुढील शिक्षणाचा विचार करणे अगत्याचे असले तरी ह्या विद्यापीठाने लोकविद्यापीठ बनण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे व त्यातून सामाजिक न्याय व समता निर्माण करणे, ही ह्या मुक्त विद्यापीठाची उदिष्टे आहेत.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षण (Distance Education) असते. ह्या पध्दतीत विद्यार्थ्याला अध्ययन-साहित्य दिले जाते. शैक्षणिक कार्यक्रमातील प्रात्यक्षिके, प्रयोग करता यावेत, ध्वनीफिती व चित्रफिती ह्यांचा लाभ व्हावा व तज्ज्ञ मार्गदर्शक अध्यापकांचे मार्गदर्शन घेता यावे, म्हणून विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रांवर संपर्कसत्रांसाठी विद्यार्थांना उपस्थित राहावे लागते. ह्या विद्यापीठाचे मुख्य कार्यालय नाशिक येथे असून अभ्यासकेंद्रे राज्यभर विखुरलेली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी नजीकच्या अभ्यासकेंद्राचा लाभ घेता येतो. या विद्यापीठाला २००२ या वर्षाचा Commonwealth of Learning या संस्थेचा Áward of Excellence for Institutional Achivement' मिळालेला आहे.

**विद्यापीठाची अधिकार मंडळे**

१. व्यवस्थापन मंडळ
२. विद्वत परिषद
३. विद्याशाखा परिषद

**विद्यापीठातील विविध विभाग**

**१. विद्यापीठातील विद्याशाखा**

अ) मानवविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
आ) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
इ) शिक्षणशास्त्र विद्याशाखा – संपर्क - ०२५३-२२३१४७२, २२३१७१४ /१५ ext – २३३१ ,३००१ , ३०१०
ई) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
उ) संगणक शास्त्र विद्याशाखा
ऊ) कृषिविज्ञान विद्याशाखा
ऋ) निरंतर शिक्षण विद्याशाखा
**ऌ)** आरोग्य विज्ञान विद्याशाखा

**विद्यापीठातील विभाग**

१. शैक्षणिक सेवा विभाग
२. विद्यार्थी सेवा विभाग
३. मूल्यमापन विभाग - संपर्क ०२५३-२२३००७३ २२३१७१४ /१५ ext. ३८०५
४. नोंदणी व परीक्षा विभाग - ०२५३- २२३१४७९, २२३०७१६, २२३१७१४ /१५ ext. ३८१०, ३८०८
५. वित्त विभाग – संपर्क ०२५३ - २२३००२६

**विद्यापीठातील केंद्रे / कक्ष /कार्यालये**

अ) कुलगुरु कार्यालय
आ) कुलसचिव कार्यालय
इ) माहिती कक्ष
ई) जनसंपर्क कक्ष
उ) ग्रंथ भांडार व वितरण कक्ष
ऊ) ग्रंथनिर्मिती केंद्र
ऋ) दृक-श्राव्य निर्मिती केंद्र
ऌ) ग्रंथालय व माहिती-श्रोत केंद्र
ऍ) विद्यार्थी कल्याण व बहि:शाल शिक्षण सेवा केंद्र

**विद्यापीठ परिभाषा**

१. **शिक्षणक्रम (Program):** य. च. म. मुक्त विद्यापीठातर्फे राबविला जाणारा बी. एड. विशेष हा एक शिक्षणक्रम आहे.
२. **अभ्यासक्रम (Course) :** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमातील EDU281, EDU282, EDU281, EDU 294 हे अभ्यासक्रम आहेत. बी. एड. विशेष शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला पाच सत्रांत एकूण सव्वीस अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करावयाचे आहेत.
३. **अभ्यासकेंद्र (Study Centre) :** य. च. म. मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त आणि बी. एड. विशेष शिक्षणक्रमाची अंमलबजावणी करणारे महाविद्यालय किंवा संस्था.
४. **केंद्रप्रमुख (Centre Head) :** य. च. म. मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यालयाचे प्रमुख. सदर व्यक्ती उच्च शिक्षणातील किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि पीएच.डी. असल्यास प्राधान्य
५. **केंद्रसंयोजक (Centre Coordinator):** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील संपूर्ण जबाबदारी सांभाळणारी संबंधित विशेष शिक्षणातील एम. एड. पदवी किमान ५५ टक्क्यांसह प्राप्त असलेली व्यक्ती. बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील प्रवेशप्रक्रिया, संपर्कसत्रे, प्रात्यक्षिके, अंतर्गत मूल्यमापन, अंतिम परीक्षा नियोजन-आयोजन अशा सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या पूर्णवेळ उपस्थित राहून पार पाडणारी अनुभवी शैक्षणिक व्यक्ती.
६. **केंद्रसहाय्यक (Centre Assistant) :** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील सर्व प्रशासकीय कामे केंद्रसंयोजकांच्या अधिपत्याखाली पार पाडणारी व्यक्ती. बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील प्रवेशप्रक्रिया, संपर्कसत्रे, अंतर्गत मूल्यमापन, अंतिम परीक्षा आयोजन,अभ्यासकेंद्र जमाखर्च इत्यादिंशी संबंधित कामे केंद्रसंयोजकाच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करणारी व्यक्ती. सदर व्यक्ती किमान बारावी उत्तीर्ण आणि क्लर्क/सहायक पदावरील तसेच संगणक-टायपिंग- इंटरनेट जाणणारी असावी.
७. **केंद्रशिपाई (Centre peon):** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची प्रवेशप्रक्रिया, संपर्कसत्रे, अंतिम परीक्षा आयोजन अशा सर्व कामात केंद्रसंयोजक आणि केंद्रसहाय्यक यांनी सांगितलेली कामे करणारी व्यक्ती.
८. **संमंत्रण (Counceling) :** मुक्त शिक्षणपद्धतीत घटकनिहाय आणि मुद्देनिहाय दररोज अध्यापन केले जात नाही.विद्यार्थ्यांनी स्वतः वाचन आणि अध्ययन करावयाचे असते. स्वयंअध्ययन करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी /शंकाचे निरसन अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्रात अध्यापकांनी /संमंत्रकांनी करणे. संमंत्रण म्हणजे सल्लाकार्य / मार्गदर्शन होय.

९. **संमंत्रक (Councilor) :** संपर्कसत्र कालावधीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे/ सल्ला देणारे/ अभ्यासक्रमातील अवघड संबोध/ संकल्पना स्पष्ट करणारे अध्यापक/ शैक्षणिक व्यक्ती. बी.एड.विशेष शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्रावर नेमण्यात येणारे संमंत्रक संबंधित क्षेत्रातील एम.एड. असतात.

१०. **संपर्कसत्रे (Contact Session) :** मुक्त शिक्षणातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासकेंद्रावर संपर्क करण्याचा, तात्विक - प्रात्यक्षिक अभ्यासक्रम मार्गदर्शन व इतर पूर्तता करण्यासाठी विद्यापीठाने निश्चित केलेला कालावधी. बी.एड. विशेष शिक्षणक्रमासाठी हा कालावधी ७० दिवसांचा असून त्याचे ९, २६, ९,२६ अशा चार संपर्कसत्रांत विभाजन करण्यात आलेले आहे.

११. **अंतर्गत मूल्यमापन (Internal Evaluation) :** अभ्यासकेंद्रामार्फत केले जाणारे मूल्यमापन.

१२. **प्रात्यक्षिके (Practicum) :** प्रात्यक्षिके असलेले अभ्यासक्रम.

१३. **अंतिम मूल्यमापन (Final Evaluation) :** विद्यापीठामार्फत आयोजित केली जाणारी अंतिम परीक्षा

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा ( School of Education )**

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. त्यातील एक म्हणजे शिक्षणशास्त्र विद्याशाखा होय. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर या विद्याशाखेने १९९१ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी.एड., १९९४ मध्ये एम.एड., शालेय व्यवस्थापन पदविका, १९९८ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी.एड. तर १९९९ पासून स्वयं-साहाय्य गट बांधणी आणि बालसेविका यांसारखे प्रमाणपत्रपासून संशोधनापर्यंत शिक्षणक्रम सुरु केले आहेत. ज्या आधारे विद्यापीठाला तळागाळातील लोकांपर्यंत बहुसंख्येने पोहोचणे शक्य झाले. वर्ष २०१५-१६ पासून बी.एड. विशेष HI आणि VI शिक्षणक्रम सुरु झाले. तसेच २०१६ पासून बी.एड.विशेष MR प्रवर्गातील शिक्षणक्रमही सुरु करण्यात आला आहे.

**बी.एड. विशेष शिक्षण (B.Ed.Spl.Ed.)**

'विशेष शिक्षण' म्हणजे कर्णबधीर, अंध, मतीमंद, अध्ययन अक्षमता असणारे, अस्थिव्यंग व मेंदुसंबंधित दुर्बलता असणाऱ्या म्हणजे विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विविध प्रकारच्या अपंग मुलांचे शिक्षण होय. हे शिक्षण अपंगांच्या विशेष शाळेत, सर्वसाधारण मुलांच्या शाळेत, समावेशित शिक्षणांतर्गत सर्व शाळांमध्ये प्रवेश दिलेल्या अपंगांना त्याच्या गरजानुसार दिले जाते.

नवीन विचारधारेनुसार आता या मुलांना 'अपंग' असे संबोधले जात नाही. ह्या सर्व मुलांना आता 'विशेष गरजा असलेली किंवा 'दिव्यांग' मुले असे संबोधले जाते. या मुलांचे शिक्षण प्रशिक्षित शिक्षकांशिवाय होऊ शकत नाही. हे विशेष शिक्षक-प्रशिक्षण ज्या महाविद्यालयास दिले जाते, त्या महाविद्यालयास 'विशेष शिक्षण अध्यापक महाविद्यालय' असे म्हणतात. या महाविद्यालयात दिले जाते. भारतीय पुनर्वास परिषद (Rehabilitation Council of India), नवी दिल्ली यांच्याद्वारे या प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम ठरविला जातो. या महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या, प्रवेशाचे निकष यांना भारतीय पुनर्वास परिषदेची मान्यता असते. भारतीय पुनर्वास परिषदेच्या केंद्रीय नोंदणी रजिस्टर (CRR) मध्ये नाव नोंदविल्याशिवाय कोणतीही व्यक्ती अथवा संस्था या क्षेत्रात काम करू शकत नाही.

**शिक्षणक्रमाची उद्दिष्ट्ये (Objectives of the Program)**

१. मानवी विकास, भारतीय शिक्षण, शालेय विषयासंदर्भातील शिक्षणशास्त्र आणि अध्ययनाचे मूल्यनिर्धारण याविषयी ज्ञान व कौशल्ये आत्मसात करणे.

२. विविध अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अपंगत्वाचे स्वरूप व त्यांच्या शैक्षणिक गरजा याबाबत ज्ञान व कौशल्ये आत्मसात करणे.

३. विविध अपंगत्व असणाऱ्या मुलांबरोबर विशेष व समावेशित परिस्थितीत काम करण्यासाठी शैक्षणिक तरतुदी व कौशल्ये यांबाबत संकल्पनात्मक आकलन करणे.

४. व्यावसायिक विकासासाठी ज्ञान व कौशल्ये वृद्धिंगत करणे.

**शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध संधी**

१. बी.एड. विशेष पूर्ण झाल्यावर समावेशित शिक्षणातील युनिटमध्ये शिक्षक म्हणून काम करता येते. तसेच पाच अपंग मुलांमागे एका शिक्षकाची नियुक्ती शाळेतील एकात्म युनिटमध्ये केली जाते.
२. महाराष्ट्र शासनाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर विविध प्रकारच्या अपंगांना शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असते.
३. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सर्व शिक्षा अभियानांतर्गत समावेशित विशेष शिक्षक/फिरते शिक्षक म्हणून काम करता येते.
४. राष्ट्रीय शिक्षण मोहिमेअंतर्गत लवकरच विषयतज्ज्ञ, विशेष शिक्षक, रिसोर्स टीचर म्हणून या विशेष शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामुळे या शिक्षकांची अधिक गरज आहे.
५. प्रशिक्षण घेऊन विशेष शाळेत विशेष शिक्षक म्हणूनही काम करता येते.
६. बी.एड. नंतर पदविका स्तरावर अधिव्याख्याता म्हणून काम करता येते.

**शिक्षणक्रम शुल्क (Fee Structure)**

| शुल्क तपशील | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|
| **परीक्षा शुल्क** | ४,३००/- | २,१५०/- | ७५०/- |
| **शैक्षणिक शुल्क** | ४,०००/- | २, ०००/- | १,०००/- |
| **नोदणी शुल्क** | १००/- | १०० /- | १००/- |
| **इतर शुल्क** | १५०/- | १५० /- | १५०/- |
| **विकासनिधी** | २,४५०/- | २,६००/- | १,००० /- |
| **अभ्यासकेंद्र शुल्क** | ७०००/- | ५०००/- | २०००/- |
| **एकूण** | **१८,०००/-** | **१२,०००/-** | **५,०००/-** |

**शुल्कासंबंधी सूचना**

विद्यार्थ्याने वरीलप्रमाणे तीन वर्षात प्रथम वर्ष – १८,००० ,द्वितीय वर्ष – १२,००० आणि तृतीय वर्ष – ५,००० असे एकूण रुपये ३५,००० इतके शुल्क तीन टप्प्यात अदा करावयाचे आहे. प्रत्येक वर्षातील शुल्काचे विद्यापीठ शुल्क आणि अभ्यासकेंद्र शुल्क दोन्हीही विद्यापीठातच online पद्धतीने भरावयाचे आहे. अभ्यासकेंद्राचे शुल्क विद्यापीठाकडून ऑनलाईन पाठविले जाणार आहे.

**माध्यम ( Medium of Instruction )**

**अ)** प्रस्तुत शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असेल. या शिक्षणक्रमासाठी तयार केलेले सर्व अध्ययन साहित्य मराठीत असेल. ज्या अभ्यासक्रमांसाठी मराठीतील अध्ययन साहित्य उपलब्ध नसेल त्या अभ्यासक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपात इंग्रजीतील अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल. अभ्यासकेंद्रावरील समंत्रण आणि इतर कामकाजही मराठी माध्यमातून असेल. ज्या उमेदवारांना अंतर्गत कार्य / प्रात्यक्षिक कार्य व अंतिम परीक्षेसाठी हिंदी / इंग्रजी माध्यम घ्यावयाचे असल्यास त्यांना विद्यापीठाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**आ)** अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमातून असतील. मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका प्रमाण मानण्यात येईल.

**अभ्यासकेंद्रावरील अनिवार्य मनुष्यबळ आणि भौतिक सुविधा**

अ) य.च.म.मुक्त विद्यापीठाने बी.एड.विशेष शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र चालविण्यासाठी पुढीलप्रमाणे मनुष्यबळ अभ्यासकेंद्रावर कार्यरत असणे अनिवार्य आहे.

- **केंद्रप्रमुख :** मान्यताप्राप्त महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यालयाचे प्रमुख. सदर व्यक्ती उच्च शिक्षणातील किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि पीएच.डी. असल्यास प्राधान्य. सदर व्यक्ती संस्थेच्या सेवेत कायम नसली तरी बी.एड.विशेष शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया, संपर्कसत्रे, आणि परीक्षा कालावधीत केंद्रावर पूर्णवेळ उपस्थित असणारी असावी.
- **केंद्रसंयोजक :** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील प्रवेशप्रक्रिया, संपर्कसत्रे, प्रात्यक्षिके, अंतर्गत मूल्यमापन, अंतिम परीक्षा नियोजन-आयोजन अशा सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या याच व्यक्तीवर असल्याने सदर व्यक्तीने विद्यापीठाच्या सर्व संबंधित विभागांशी संपर्कात राहणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाने वेळोवेळी बोलाविलेल्या कामांसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. अपरिहार्य परिस्थितीत स्वतः ऐवजी प्रतिनिधी पाठवावा. मात्र तो प्रतिनिधी संमंत्रकांपैकी असावा.
- **संमंत्रक :** भारतीय पुनर्वास परिषदेच्या नियमानुसार बी.एड. विशेष शिक्षणक्रमातल्या संबंधित प्रवर्गातील (HI /VI /MR) एक सहयोगी प्राध्यापक आणि चार सहाय्यक प्राध्यापक संमंत्रक म्हणून नेमणे अनिवार्य आहे. या पाचपैकी एक जनरल एम.एड. आणि उर्वरित चार संमंत्रक संबंधित प्रवर्गातील एम.एड.झालेले असणे अनिवार्य आहे. सदरच्या पाच शैक्षणिक व्यक्ती पूर्ण वेळ सेवेत नसल्या तरी विद्यापीठाने नियोजित केलेल्या संपर्कसत्रांच्या वेळापत्रकानुसार त्या केंद्रावर उपस्थित असणे अनिवार्य आहे. प्रत्येक अभ्यासकेंद्रावरील संमंत्रक विद्यापीठाने बोलाविलेल्या उद्बोधन कार्यक्रम, तसेच प्रश्नलेखक, प्राश्निक, परीक्षक, समीक्षक इत्यादी कामांसाठी येणे आवश्यक राहील.
- **केंद्रसहाय्यक :** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील प्रवेशप्रक्रिया, संपर्कसत्रे, अंतर्गत मूल्यमापन, अंतिम परीक्षा आयोजन, अभ्यासकेंद्र जमाखर्च इत्यादिंशी संबंधित कामे केंद्रसंयोजकाच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची असल्याने एक व्यक्ती पूर्णवेळ अभ्यासकेंद्रावर कार्यरत असणे आवश्यक आहे.
- **केंद्रशिपाई :** बी. एड. विशेष या शिक्षणक्रमाची प्रवेशप्रक्रिया, संपर्कसत्रे, अंतिम परीक्षा आयोजन अशा सर्व कामात केंद्रसंयोजक आणि केंद्रसहाय्यक यांनी सांगितलेली कामे करण्यासाठी सदरची व्यक्ती केंद्रावर पूर्णवेळ असणे आवश्यक आहे.

**अभ्यासकेंद्रावरील भौतिक सुविधा**

- **अभ्यासकेंद्र नामफलक :** संस्थेच्या बाहेर दर्शनी भागात पत्र्याचा ४ x ३ आकाराचा फलक.
- **अभ्यासकेंद्र कार्यालय :** संस्थेच्या प्रवेशद्वारापासून जवळ आणि दर्शनी भागात असावे. या कार्यालयाबाहेर केंद्रसंयोजक आणि केंद्रसहाय्यक यांची नावे व संपर्क क्रमांक लिहिलेले/ छापलेले असावेत.
- **वर्गखोल्या :** प्रत्येकी किमान तीस बाक असलेल्या तीन वर्गखोल्या. एकापेक्षा अधिक प्रवर्गाचे शिक्षणक्रम राबविणाऱ्या अभ्यासकेंद्रावर तीन + एक अशा एकूण चार वर्गखोल्या असाव्यात.

- **ग्रंथालय :** शिक्षणशास्त्र तसेच संबंधित विशेष प्रवर्गातील संदर्भ ग्रंथ आणि नियतकालिके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असावेत. यासाठी स्वतंत्र नोंदवही असावी.
- **प्रात्यक्षिकांसाठी शाळा :** शिक्षणक्रमाची प्रात्याक्षिके पूर्ण करण्यासाठी राज्य शासन मान्यता प्राप्त विशेष आणि समावेशित शाळा व्यवस्थापनाशी करार केलेला असावा. या शाळा माध्यमिक स्तरावरील असाव्यात.
- **प्रात्यक्षिक खोली / क्लिनिक्स/ मानसशास्त्र प्रयोगशाळा :** शिक्षणक्रमातील विविधअभ्यासक्रमातील अंतर्गत कार्य / प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी संबंधित प्रवर्गातील आवश्यक त्या प्रयोगशाळा, हॉस्पिटल्स, क्लिनिक्स यांच्याशी करार केलेला असावा.

**शिक्षणक्रम संरचना (Program Structure)**

**अ) श्रेयांक : ८० (१ श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ तासांचा अभ्यास)**

**आ) अभ्यास तासिका : २४०० - २६०० घड्याळी तास**

**इ)** शिक्षणक्रम कालावधी : सदर शिक्षणक्रमात पाच सत्रे म्हणजेच अडीच वर्षाचा किमान कालावधी असेल. शिक्षणक्रमाचा नोंदणी कालावधी पाच वर्षांचा असेल. या कालावधीत शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण न झाल्यास उमेदवारास विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क भरून शिक्षणक्रमासाठी पुनर्नोंदणी करावी लागेल.

**ई) सत्रनिहाय संरचना**

## बी.एड. विशेष शिक्षण (HI)

| अक्र | अभ्यास-क्रम संकेतांक | RCI संकेतांक | अभ्यासक्रम | तात्विक/ प्रात्यक्षिक | अभ्यास तासिका | श्रेयांक | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **सत्र पहिले** | | | | |
| १ | EDU281 | A1 | मानवी वाढ आणि विकास | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU282 | A2 | भारत आणि समकालीन शिक्षण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU292 | B7 | सांवेदिक अपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU293 | B8 | मज्जासंस्था विकासासंबंधित अपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ५ | EDU294 | B9 | चलनवलनविषयक अपंगत्व व बहुअपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ६ | EDU332.1 | E1 | क्रॉस डिसॅबिलीटी अँड इन्क्लुजन | प्रात्यक्षिक | ६५ | २ | ५० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र दुसरे** | | | | |
| १ | EDU283 | A3 | अध्ययन,अध्यापन आणि मूल्यनिर्धारण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU341-EDU344 | A4 | विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (कोणताही १) (शास्त्र/ गणित/ इतिहास/ भूगोल ) | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU291 | B6 | समावेशित शिक्षण | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU321 | C12 | मूल्यनिर्धारण आणि गरजांची ओळख | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU333.1 | E2 | अपंगत्व विशेषीकरण | प्रात्यक्षिक | ६५ | २ | ५० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र तिसरे** | | | | |
| १ | EDU346-EDU348 | A5 | मराठी / हिंदी /इंग्रजी यांपैकी एक भाषा | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU322 | C13 | अभ्यासक्रम संरचना अनुकूलन आणि मूल्यमापन | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU323 | C14 | हस्तक्षेपण आणि अध्यापन कार्यनिती | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ४ | EDU333.2 | E2 | अपंगत्व विशेषीकरण | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र चौथे** | | | | |
| १ | EDU301-309 | B10 | कौशल्याधारित पर्यायी अभ्यासक्रम (कोणताही एक ) | तात्विक | ६५ | २ | ५० |
| २ | EDU324 | C15 | तंत्रज्ञान आणि अपंगत्व | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU325 | C16 | मनोसामाजिक आणि कौटुंबिक समस्या | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU335 | F1 | मुख्य अपंगत्व (विशेष शाळेशी संबंधित अध्यापन ) | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU326 | D17 | आशयाचे वाचन आणि आकलन | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ६ | EDU327 | D18 | शिक्षणातील नाट्य आणि कला | तात्विक | ६५ | २ | ५० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र पाचवे** | | | | |
| १ | EDU311-316 | B11 | कौशल्याधारित अभ्यासक्रम अपंगत्व विशेषीकरण (कोणताही एक ) | तात्विक | ६५ | २ | ५० |
| २ | EDU328 | D19 | मूलभूत संशोधन आणि संख्याशास्त्र | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ३ | EDU332.2 | E1 | क्रॉस डिसॅबिलीटी अँड इन्क्लुजन | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ४ | EDU336 | F2 | इतर अपंगत्वविषयक प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU337 | F3 | समावेशित शाळा : प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **५ सत्रे एकूण** | | **२६००** | **८०** | **२०००** |

**बी.एड. विशेष शिक्षण (VI)**

| अ.क्र. | अभ्यासक्रम संकेतांक | RCI संकेतांक | अभ्यासक्रम | तात्विक/ प्रात्यक्षिक | अभ्यास तासिका | श्रेयांक | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **सत्र पहिले** | | | | |
| १ | EDU281 | A1 | मानवी वाढ आणि विकास | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU282 | A2 | भारत आणि समकालीन शिक्षण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU292 | B7 | सांवेदिक अपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU293 | B8 | मज्जासंस्था विकासासंबंधित अपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ५ | EDU294 | B9 | चलनवलनविषयक अपंगत्व आणि बहुअपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ६ | EDU332.1 | E1 | क्रॉस डिसॅबिलीटी स्पेशलायझेशन | प्रात्यक्षिक | ६५ | २ | ५० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र दुसरे** | | | | |
| १ | EDU283 | A3 | अध्ययन,अध्यापन आणि मूल्यनिर्धारण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU341-EDU344 | A4 | विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (कोणताही १) (शास्त्र/ गणित/ इतिहास /भूगोल ) | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU291 | B6 | समावेशित शिक्षण | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU351 | C12 | दृष्टिबाधितांची ओळख व गरजांचे मूल्यनिर्धारण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU333.1 | E2 | अपंगत्व विशेषीकरण | प्रात्यक्षिक | ६५ | २ | ५० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र तिसरे** | | | | |
| १ | EDU346-EDU348 | A5 | मराठी / हिंदी /इंग्रजी यांपैकी एक भाषा | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU352 | C13 | अभ्यासक्रम, अनुकूलन आणि विस्तारित पाठ्यक्रम अध्यापनाची कार्यनिती | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU353 | C14 | हस्तक्षेपण आणि अध्यापन कार्यनिती | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ४ | EDU333.2 | E2 | अपंगत्व विशेषीकरण | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र चौथे** | | | | |
| १ | EDU301-309 | B10 | कौशल्याधारित पर्यायी अभ्यासक्रम (कोणताही एक) | तात्विक | ६५ | 2 | ५० |
| २ | EDU354 | C15 | दृष्टिबाधितांचे शिक्षण आणि तंत्रज्ञान | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU355 | C16 | मनोसामाजिक आणि कौटुंबिक समस्या | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU335 | F1 | मुख्य अपंगत्व (विशेष शाळेशी संबंधित अध्यापन ) | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU326 | D17 | आशयाचे वाचन आणि आकलन | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ६ | EDU327 | D18 | शिक्षणातील नाट्य आणि कला | तात्विक | ६५ | २ | ५० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **सत्र पाचवे** | | | | |
| १ | EDU311-315 | B11 | कौशल्याधारित अभ्यासक्रम अपंगत्व विशेषीकरण (कोणताही एक ) | तात्विक | ६५ | २ | ५० |
| २ | EDU328 | D19 | मूलभूत संशोधन आणि संख्याशास्त्र | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ३ | EDU332.2 | E1 | क्रॉस डिसॅबिलीटी अँड इन्क्लुजन | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ४ | EDU336 | F2 | इतर अपंगत्वविषयक प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU337 | F3 | समावेशित शाळा : प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| | | | **एकूण** | | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **५ सत्रे एकूण** | | **२६००** | **८०** | **२०००** |

## बी.एड. विशेष शिक्षण (MR)

| अ.क्र. | अभ्यास-क्रम संकेतांक | RCI संकेतांक | अभ्यासक्रम | तात्विक/ प्रात्यक्षिक | अभ्यास तासिका | श्रेयांक | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **सत्र पहिले** | | | | | | | |
| १ | EDU281 | A1 | मानवी वाढ आणि विकास | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU282 | A2 | भारत आणि समकालीन शिक्षण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU292 | B7 | सांवेदिक अपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU293 | B8 | मज्जासंस्था विकासासंबंधित अपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ५ | EDU294 | B9 | चलनवलनविषयक अपंगत्व व बहुअपंगत्वाची ओळख | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ६ | EDU332.1 | E1 | क्रॉस डिसॅबिलीटी स्पेशलायझेशन | प्रात्यक्षिक | ६५ | २ | ५० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| **सत्र दुसरे** | | | | | | | |
| १ | EDU283 | A3 | अध्ययन,अध्यापन आणि मूल्यनिर्धारण | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU341-EDU344 | A4 | विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (कोणताही १) (शास्त्र/गणित/इतिहास/भूगोल ) | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU291 | B6 | समावेशित शिक्षण | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU361 | C12 | मूल्यनिर्धारण आणि गरजांची ओळख | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU333.1 | E2 | अपंगत्व विशेषीकरण | प्रात्यक्षिक | ६५ | २ | ५० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| **सत्र तिसरे** | | | | | | | |
| १ | EDU346-EDU348 | A5 | मराठी / हिंदी /इंग्रजी यांपैकी एक भाषा | तात्विक | १३० | ४ | १०० |
| २ | EDU362 | C13 | अभ्यासक्रम संरचना अनुकूलन आणि मूल्यमापन | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU363 | C14 | हस्तक्षेपण आणि अध्यापन कार्यनिती | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ४ | EDU333.2 | E2 | अपंगत्व विशेषीकरण | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| **सत्र चौथे** | | | | | | | |
| १ | EDU301-309 | B10 | कौशल्याधारित पर्यायी अभ्यासक्रम (कोणताही एक ) | तात्विक | ६५ | २ | ५० |
| २ | EDU364 | C15 | तंत्रज्ञान आणि अपंगत्व | तात्विक | १३० | ४ | १०० |
| ३ | EDU365 | C16 | मनोसामाजिक आणि कौटुंबिक समस्या | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ४ | EDU335 | F1 | मुख्य अपंगत्व (विशेष शाळेशी संबंधित अध्यापन ) | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU326 | D17 | आशयाचे वाचन आणि आकलन | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ६ | EDU327 | D18 | शिक्षणातील नाट्य आणि कला | तात्विक | ६५ | २ | ५० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| **सत्र पाचवे** | | | | | | | |
| १ | EDU311-316 | B11 | कौशल्याधारित अभ्यासक्रम अपंगत्व विशेषीकरण (कोणताही एक ) | तात्विक | ६५ | २ | ५० |
| २ | EDU328 | D19 | मूलभूत संशोधन आणि संख्याशास्त्र | तात्विक | ६५ | २ | ५० |
| ३ | EDU332.2 | E1 | क्रॉस डिसॅबिलीटी अँड इन्क्लुजन | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ४ | EDU336 | F2 | इतर अपंगत्वविषयक प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| ५ | EDU337 | F3 | समावेशित शाळा : प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक | १३० | ४ | १०० |
| | | | | **एकूण** | **५२०** | **१६** | **४००** |
| | | | **५ सत्रे एकूण** | | **२६००** | **८०** | **२०००** |

**अध्यापनपद्धती आणि वैकल्पिक अभ्यासक्रम निवडीबाबत सूचना**

बी.एड.विशेष शिक्षण (HI / VI / MR ) शिक्षणक्रम पूर्ण करताना पाच सत्रात एकूण चार वैकल्पिक अभ्यासक्रमांची निवड करावयाची आहे. हे अभ्यासक्रम सत्र दोन ते सत्र पाच यामध्ये निवडावयाचे आहेत.

**सत्र दोनमधील वैकल्पिक अभ्यासक्रम**

सत्र दोनमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला पाच अभ्यासक्रम पूर्ण करावयाचे आहेत. यातील दुसरा अभ्यासक्रम निवडताना

१. EDU341- शास्त्र,
२. EDU342- गणित,
३. EDU343- इतिहास,
४. EDU- 344 भूगोल

या शालेय विषय अध्यापनपद्धतीपैकी कोणतीही एक अध्यापनपद्धती विद्यार्थ्याने निवडायची आहे. विद्यार्थी स्वतःच्या आवडीनुसार कोणतीही एक अध्यापनपद्धती निवडू शकतो. कला शाखेतील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थी इतिहास किंवा भूगोल अध्यापनपद्धती निवडू शकतात. विज्ञान शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थी गणित अथवा विज्ञान अध्यापनपद्धतीची निवड करू शकतात. वाणिज्य शाखेतील विद्यार्थी गणित किंवा भूगोल अभ्यासक्रमाची निवड करू शकतात. प्रथम सत्राचा प्रवेश अर्ज भरताना हा अभ्यासक्रम अर्जात नमूद करणे अनिवार्य आहे.

**सत्र तीनमधील वैकल्पिक अभ्यासक्रम**

सत्र तीनमध्ये भाषाविषयक अध्यापनपद्धतीचा समावेश आहे. यात मराठी, हिंदी आणि इंग्रजी या अध्यापन पद्धतींचे पर्याय विद्यार्थ्यांना देण्यात आले आहेत.

१. EDU346-मराठी,
२. EDU347- हिंदी,
३. EDU348- इंग्रजी

यापैकी एक अभ्यासक्रम निवडायचा आहे.

**सत्र चारमधील वैकल्पिक अभ्यासक्रम**

सत्र चारमध्ये विद्यार्थ्यांना क्रॉस डीसाबीलीटी अँड इनक्लुजन या संदर्भातील कौशल्याधारित अभ्यासक्रमाची निवड करावयाची आहे. यासाठी विद्यार्थ्यास एकूण सहा पर्याय उपलब्धआहेत. त्यांपैकी विद्यार्थ्याने एका वैकल्पिक अभ्यासक्रमाची निवड चौथ्या सत्रात करावयाची आहे. ह्या अभ्यासक्रमासाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत.

१. EDU301- Guidance and Counseling
२. EDU302- Early Childhood and Education
३. EDU303 - Application of ICT in Classroom
४. EDU304 - Adult Education
५. EDU305 - Self Help group and Education
६. EDU309- Braille and Assistive Devices

**सत्र पाचमधील वैकल्पिक विषय**

सत्र पाचमध्ये विद्यार्थ्यांना निवडलेल्या प्रवर्गात प्रभावी अध्यापन करतांना लागणाऱ्या कौशल्यांचे ज्ञान या वैकल्पिक अभ्यासक्रमातून मिळणार आहे. HI प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी EDU312, VI प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी EDU311 तर MR प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी EDU314 हया अभ्यासक्रमाची निवड करण्याचे मार्गदर्शन दिले जावे.

१. EDU311- Orientation and Mobility,
२. EDU312- Communication Option: Oralism / Oral Rehabilitation Approachh,
३. EDU314- Augmentative and Alternative Communication)

**संपर्कसत्रे**

- २ वर्ष आणि ६ महिने कालावधीत ५ संपर्कसत्रे असतील. या पाच सत्रांतील कालावधीत चार संपर्क सत्रे रोज घड्याळी सहा तास या प्रमाणे असतील.
- संपर्क सत्रांना उमेदवारांची उपस्थिती अनिवार्य असेल.
- अंतिम परीक्षेस पात्र होण्यासाठी प्रत्येक संपर्कसत्रात ८० टक्के उपस्थिती व सर्व संपर्कसत्रे पूर्ण करणे अनिवार्य असेल.
- **संपर्कसत्रे वेळापत्रक –** परिशिष्ट १
- **अंतिम परीक्षेस पात्रतेच्या अटी व प्रात्यक्षिक कार्य**

  अ) सर्व संपर्कसत्रे, अंतर्गत कार्य आणि प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केल्याशिवाय अंतिम परीक्षेस बसता येणार नाही.

  आ) शिक्षणक्रमातील सर्व प्रात्यक्षिक कार्याची पूर्तता केल्याचे अभ्यासकेंद्राचे प्रमाणपत्र विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर छात्र शिक्षकास परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

**मूल्यमापन**

- एकूण गुण : २०००
- तात्विक भाग : १४०० गुण
- प्रात्यक्षिक भाग : ६०० गुण

शिक्षणक्रमात छात्रशिक्षकांचे मूल्यमापन दोन प्रकारे होईल.

अ) शिक्षणक्रम पूर्ण करीत असताना केले जाणारे अंतर्गत मूल्यमापन.

आ) शिक्षणक्रमात प्रत्येक सत्रानंतर होणारी अंतिम लेखी परीक्षा.

प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन व गुणदान अभ्यासकेंद्रामार्फत होईल. तात्विक भागातील अभ्यासक्रमांसाठी अन्तर्गत म्हणजे अभ्यासकेंद्रावरील गुणदान २५ टक्के राहील. उर्वरित ७५ टक्के भागाची अंतिम परीक्षा विद्यापीठ मुख्यालयमार्फत घेण्यात येईल. याचाच अर्थ अंतिम परीक्षा आणि अंतर्गत मूल्यनिर्धारण यांचे महत्वप्रमाण ७५:२५ असे राहील.

**उतीर्णतेचे नियम**

अ) तात्विक अभ्यासक्रमात उतीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के व सर्व तात्विक अभ्यासक्रमात एकत्रितरित्या किमान ५० टक्के गुण मिळविणे अनिर्वाय राहील.

आ) प्रात्यक्षिक भागात उतीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रात्यक्षिक भागात किमान ४० टक्के व सर्व प्रात्यक्षिक अभ्यासक्रमात एकत्रितरित्या किमान ५० टक्के गुण मिळविणे अनिर्वाय राहील.

**अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाच्या सूचना**

१. प्रस्तुत बी. एड. विशेष शिक्षण क्रम अडीच वर्ष आणि पाच सत्रांचा आहे. त्याची अभ्यासकेंद्रावर अंमलबजावणी करताना एकूण चार संपर्क सत्रे होतील.

२. संपर्कसत्रांत विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे. विद्यार्थी अपरिहार्य कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्याच्याकडून केंद्रसंयोजंकांच्या नावे सकारण विनंती अर्ज आवश्यक कागदपत्रांसह घ्यावा.

३. अभ्यास केंद्रावर होणारी संपर्कसत्रे संमंत्रकांनी अभ्यासपूर्ण रीतीने व गांभीर्याने घेणे अपेक्षित आहे.

४. संपर्कसत्र कालावधीत केंद्रप्रमुख, केंद्रसंयोजक, केंद्रसहाय्यक, शिपाई व सर्व संमंत्रकांची हजेरी पुस्तिका असावी. याच कालावधीत विद्यार्थ्यांसाठीही स्वतंत्र हजेरीपुस्तिका असावी.

५. क्षेत्रीय कार्य तसेच शालेय प्रात्यक्षिक कार्यासाठी विद्यार्थी अभ्यासकेंद्राबाहेरील शाळेत वा अन्यत्र गेलेला असल्यास तशी नोंद हजेरीपुस्तिकेत यावी.

६. संपर्कसत्र कालावधी व्यतिरिक्त वेळेत विद्यार्थी जेथे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करत असेल तेथील मुख्याध्यापक /उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक /संस्थाप्रमुख/संचालक वा समकक्ष अधिकाऱ्याकडून ते पूर्ण केल्याबाबत प्रमाणित करून घ्यावे.

७. चारही संपर्कसत्रे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या कालावधीतच घेणे अपेक्षित आहे. यासंदर्भात अभ्यासकेंद्राने कोणताही बदल परस्पर करू नये. अपरिहार्य परिस्थितीत बदल करावयाचे असल्यास विद्याशाखेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. अशी परवानगी घेण्यासाठीचा विनंती अर्ज विद्याशाखेकडे पुनर्नियोजित संपर्कसत्र सुरु होण्याच्या किमान पाच दिवस आधी इ-मेलद्वारा पाठविणे आवश्यक राहील.

८. संपर्कसत्र कालावधीत अभ्यासकेंद्रावर विद्यापीठ प्रतिनिधींच्या अनपेक्षित भेटी नियमितपणे होतील. या भेटीदरम्यान विद्यापीठ प्रतिनिधींनी मागितलेली माहिती आणि कागदपत्रे अभ्यासकेंद्राने उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे.

९. अध्यापनपद्धतीची आणि वैकल्पिक अभ्यासक्रमांची संपर्कसत्रे अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गट करून घेण्यात यावीत.

१०. संपूर्ण शिक्षणक्रम राबविताना माहिती पुस्तिकेतील पारिभाषिक संज्ञा आणि शिक्षणक्रम व अभ्यासक्रम संकेतांकाचा वापर करावा. कारण विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार, परीक्षा व इतर कारणांसाठी विद्यापीठीय परिभाषा आणि संकेतांकाचा वापर केला जातो.

११. प्रात्यक्षिक संपर्कसत्रांत प्रात्यक्षिकांचे स्वरूप, प्रत्यक्ष करण्याची कृती, गुणदान योजना, गुणदानाचे नियम या बाबी स्पष्ट सांगायच्या आहेत. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक हे नियोजित वेळेनुसारच घ्यावयाचे आहे.

१२. तात्त्विक अभ्यासक्रमांच्या अंतर्गत कार्याचे गुण विद्यापीठाने ठरविलेल्या गुणदान योजनेच्या अंतर्गतच द्यावयाचे आहेत.

१३. तात्विक अभ्यासक्रमातील अंतिम परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन यांचे अंतिम निकालासाठीचे महत्वप्रमाण अनुक्रमे ७५ :२५ असे राहील.

१४. ४ श्रेयांकाच्या तात्विक अभ्यासक्रमांसाठी ५० गुणांचे, तर २ श्रेयांकांच्या तात्विक अभ्यासक्रमासाठी २५ गुणाचे अंतर्गत गुणदान अभ्यासकेंद्राने करावयाचे आहे. या गुणदानात ५० गुणांचे रूपांतरण २५ मध्ये तर २५ गुणांचे रूपांतरण १३ गुणांपैकी करून विद्यापीठातील परीक्षा नियंत्रकांकडे पाठवायचे आहे.

१५. प्रात्यक्षिक भागातील अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र अंतिम परीक्षा होणार नाही. त्यामुळे या अभ्यासक्रमांचे अभ्यासकेंद्रांवरील प्रात्यक्षिकांचे अभ्यासकेंद्राने दिलेले १००/५० पैकी गुण हे त्या अभ्यासक्रमाचे अंतिम गुण गृहीत धरण्यात येतील. सदर गुणदान आणि प्रात्यक्षिकांसंबंधित कागदपत्रे अभ्यासकेंद्रांनी जतन करून ठेवावयाची आहेत.विद्यापीठ प्रतिनिधींकडून सदरची कागदपत्रे आणि गुणदान यांची पडताळणी वेळोवेळी केली जाईल.

१६. तात्विक भागातील अंतर्गत कार्य तसेच प्रात्यक्षिक भागातील कार्यासाठीचे आराखडे व गुणदान तक्ते विद्यापीठाकडून पाठविण्यात येतील.

१७. केंद्रावरील केंद्रप्रमुख, केंद्रसंयोजक, केंद्रसहाय्यक, शिपाई यांचे मानधन तसेच प्रात्यक्षिकांचे मानधनही प्रति विद्यार्थी ठरविण्यात आले आहे. यासंबंधित तक्ता परिशिष्टांत जोडलेला आहे.

१८. अभ्यासकेंद्रावरील प्रत्येक बाबीसाठीचे मानधन विद्यापीठाने निश्चित केलेल्या प्रमाणकांनुसारच द्यावयाचे आहे.

१९. अभ्यासकेंद्राने अभ्यासकेंद्र निधीतील केलेल्या खर्चाचे ऑडिट करून त्याचा तुकडीनिहाय रिपोर्ट विद्यापीठाकडे सादर करावयाचा आहे.

२०. शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य सध्या इ- माध्यमाद्वारे देण्यात येत आहे. शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य मराठीत किंवा इंग्रजीत असेल. यासाठी सर्व संपर्कसत्रे व्यवस्थित होणे गरजेचे आहे. याचबरोबर अभ्यासकेंद्रावरील ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी उपलब्ध करून देणे अगत्याचे आहे.

२१. संपर्कसत्राबाबत व शिक्षणक्रमाबाबत आवश्यक सूचना देण्यासाठी आणि संपूर्ण शिक्षणक्रमाचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी आपल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांसमवेत संपर्क करताना 'Whats App' तंत्राचा वापर करणे उचीत होईल. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविणे तसेच एकत्रित सूचना प्रसारित करणे सोपे होईल.

२२. विद्यापीठ व अभ्यासकेंद्र यांच्यातील संप्रेषण सुरळीत होण्यासाठी केंद्रसंयोजकांचा इ- मेल आयडी आणि भ्रमणध्वनी / Whats App क्रमांक शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नमूद केलेला आहे याची खात्री करून घ्यावी.

- **अभ्यासकेंद्र मानधन दरपत्रक**

अभ्यासकेंद्र मानधन हे विद्यार्थिसंख्येनुसार ठरविण्यात आलेले आहेत. केंद्रावरील चार व्यक्ती मानधन हे प्रति विद्यार्थी ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे हे मानधन हे विद्यार्थीसंख्येनुसार धरण्यात येईल. खाली दिलेले मानधन हे अडीच वर्षासाठी आहे.

| अ.क्र. | केंद्रातील व्यक्ती | प्रति विद्यार्थी मानधन (रुपयात) |
|---|---|---|
| १. | केंद्रप्रमुख | ४०१/- |
| २. | केंद्रसंयोजक | ४००/- |
| ३. | केंद्रसाहाय्यक | २००/- |
| ४. | केंद्र शिपाई | १३०/- |
| ५. | संमंत्रक मानधन | प्रति तास २०० रुपये |

**Remuneration for internal work for core courses (Remuneration per students)**

| SN | Internal work description | Remuneration per student |
|---|---|---|
| 1 | Checklist/screening tool/assessment tool/teacher made test | 20/- |
| 2 | Journal writing /Comparative Analysis /pedagogical analysis | 30/- |
| 3 | Report writing /Action Research plan/writing reflections/curriculum and implementation report /survey report | 30/- |
| 4 | Case study | 30/- |
| 5 | Visit report | 30/- |
| 6 | Development of TLM/leaflet/poster/making word list | 10/- |
| 7 | Adaptation/story writing | 30/- |
| 8 | Profiling speech | 20/- |
| 9 | Seminar/Multimedia presentation/team presentation of case study | 30/- |

| | | |
|---|---|---|
| 10 | Home Assignment | 20/- |
| 11 | Short project | 15/- |
| 12 | Developing Question paper | 15/- |

**Compulsory Practicals and remuneration per student.**

| Sr.N. | Practical Particulars | Remuneration per student |
|---|---|---|
| 1 | Micro lesson/ Integrated/simulated teaching (for all lessons) | 40/- |
| 2 | Audio lesson/Speech Lesson (Done by councillors/school authority) (for all lessons) | 50/- |
| 3 | Lesson observation (Done by school teachers/college authorities) | 25/- (Per lesson) |
| 4 | Classroom observation report | 10/- |
| 5 | Internship Report | 50/- |
| 6 | IEP lesson | 15/- (Per lesson) |